0 7 AUG 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'बेटी बचाओ' शोधनिबंधांचा संग्रह पथदर्शक

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के : शिवाजी विद्यापीठात संग्रहाचे प्रकाशन



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बेटी बचाओ अभियानांतर्गत शोधनिबंध संग्रह ग्रंथाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. या वेळी शेजारी डॉ. प्रमोद पाटील, विलास शिंदे, प्रकाश गायकवाड, प्रतिभा देसाई, भारती पाटील, आदी उपस्थित होते.**

कोल्हापूर, ता. ६ : 'शिवाजी विद्यापीठाच्या 'बेटी बचाओ अभियानाअंतर्गत प्रकाशित करण्यात आलेला शोधनिबंधांचा संग्रह देशभरातील संशोधकांसह धोरणकर्त्यांसाठी पथदर्शक स्वरुपाचा आहे', असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी येथे केले.

विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियानातर्फे 'गर्ल चाइल्ड इन महाराष्ट्रः इश्यूज् अँन्ड प्रॉस्पेक्टस' या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. त्यामध्ये महाराष्ट्रासह अन्य काही राज्यांतीलही संशोधकांनी शोधनिबंध सादर केले. या शोधनिबंधांचे विद्यापीठातर्फे ग्रंथरुपात एकत्रित संकलन करण्यात आले. डॉ. प्रतिभा पवार यांनी संपादित केलेल्या या ग्रंथाचे आज कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'अनेक परिसंवाद होत असतात, मात्र त्यांचे अशा पद्धतीने उपयुक्त दस्तावेजीकरण होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यातील निरीक्षणे आणि निष्कर्षांचा लाभ धोरणकर्त्यांच्या माध्यमातून समाजाला करवून देता येणे त्यामुळे शक्य होते.' प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'या ग्रंथामध्ये एकूण ४४ शोधनिबंध आहेत. त्यातील २६ इंग्रजी आहेत. त्यामुळे हा ग्रंथ केवळ राज्यातीलच नव्हे, तर देशभरातील संशोधकांसाठी एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ ठरणार आहे. सद्यस्थितीत राज्याच्या आणि देशाच्या विविध भागांतील स्त्री-पुरूष प्रमाणाचा आढावा घेऊन अभियानाच्या पुढील संशोधन, जनजागृतीची दिशा ठरवावी लागेल.'

या कार्यक्रमात शारदाबाई पवार अध्यासनाच्या संचालक डॉ. भारती पाटील आणि समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रतिमा पवार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. जगन कराडे, राजश्री बारवेकर, प्रा. मीना पोतदार, प्रा. प्रल्हाद माने उपस्थित होते. डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. योजना पाटील यांनी आभार मानले.

### विद्यार्थ्यांचा घटता दर चिंतेची बाब

महाविद्यालयांनी या अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थांसमवेत जनजागृतीचे कार्य करण्यावर भर द्यावा. विद्यार्थिनींच्या गुणवत्तावाढीचा दर आणि उच्चशिक्षणाच्या प्रवाहातील प्रवेशाचा दर वाढत असताना दुसरीकडे विद्यार्थ्यांचा घटता दर ही सुद्धा सामाजिक चिंतेची बाब आहे. त्या दिशेनेही आता चिकित्सक संशोधनाची गरज निर्माण झाल्याचे मत कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यक्त केले.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. प्रमोद पाटील, विलास शिंदे आदी उपस्थित होते.

# विद्यापीठाने अभ्यास, जनसेवेची दिली प्रेरणा

## स्पर्धा परीक्षेतील गुणवंतांच्या भावना

कोल्हापूर, ता. ६ : अभ्यास आणि जनसेवेची प्रेरणा शिवाजी विद्यापीठाने दिली. स्पर्धा परीक्षेतील आमच्या यशामध्ये विद्यापीठाच्या मार्गदर्शन केंद्र, ग्रंथालयाचे मोलाचे योगदान आहे, अशी कृतज्ञतेची भावना महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह विविध स्पर्धा परीक्षांत यश प्राप्त केलेल्या उमेदवारांनी व्यक्त केले.

विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे विद्यार्थी प्रतीक लंबे यांनी सहाय्यक कक्ष अधिकारी व राज्य कर निरीक्षक आणि सहाय्यक आयुक्त (महानगरपालिका/मुख्याधिकारी), प्रिया काटकर यांनी राज्य कर निरीक्षक आणि कामगार अधिकारी, अजिंक्य इंगवले यांनी सहायक निबंधक (सहकार), सौरभ साळुंखे यांनी पोलिस उपनिरीक्षक, प्रशांत श्रृंगारे यांनी पोलिस उपनिरीक्षक व मंत्रालय क्लार्क, रजत खोपडे यांनी मंत्रालय क्लार्क, धनश्री मौर्य यांनी न्यायालय क्लार्क, श्रीधर गुरव यांनी राज्य कर निरीक्षक आणि स्नेहा मोरे यांनी सहायक शाखा पोस्टमास्टर (भारतीय पोस्ट) परीक्षेत यश मिळविले. त्यांचा सत्कार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला.

### काम हीच आपली ओळख बनवा

'स्पर्धा परीक्षार्थींना कमीत कमी शुल्कात जास्तीत जास्त सुविधा देण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. या उमेदवारांनी प्रशासकीय सेवेमध्ये आपले काम हीच आपली ओळख बनवावी. आपल्यासह आपल्या कुटुंबियांचा आणि विद्यापीठाचा लौकिक उंचवावा', असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले.

यावेळी प्रतीक यांनी अत्यंत माफक शुल्कात विद्यापीठाने उपलब्ध केलेले मार्गदर्शन आणि ग्रंथालय सुविधा यांनी आपल्या यशात महत्त्वाची भूमिका बजावल्याचे सांगितले. प्रिया यांनी विद्यापीठाच्या परिसरामध्ये अभ्यासाला अत्यंत पोषक वातावरण असून इथे आले की अभ्यासाला चालना मिळत राहिली, म्हणूनच यश साध्य झाल्याचे सांगितले. सौरभ यांनी सन २०१९ मध्ये विद्यापीठ प्रशासनाने महापूर काळात आपद्ग्रस्तांना केलेली मदत आणि उभारलेली निवारा केंद्रे पाहून प्रशासनात जाऊन जनसेवा करण्याची प्रेरणा मिळाल्याचे सांगितले.

0 6 AUG 2023 महासल्ला

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये माने महाविद्यालय प्रथम



कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के यांच्या हस्ते पुरस्कार स्विकारताना संस्थेचे उपाध्यक्ष सुनिल माने,प्राचार्य डॉ.चौगुले.

कागल,ता.५(प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठामार्फत दरवर्षी देण्यात येणाऱ्या विविध गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये निमशहरी विभागात डी.आर. माने महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात शैक्षणिक गुणवत्ता, क्रीडा व निराधार विद्यार्थी या प्रकारामध्ये महाविद्यालयाच्या एकूण ३४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. सलग दुसऱ्या वर्षी डी.आर. माने महाविद्यालयाला हा बहुमान मिळालेला आहे. पुरस्कार वितरण सोहळा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के,डॉ. पी.एस. पाटील यांच्या उपस्थितीत पार पडला. महाविद्यालयातर्फे संस्थेचे उपाध्यक्ष सुनील माने व प्राचार्य डॉ. प्रवीण चौगले यांनी पुरस्कार स्विकारला. यावेळी अधिसभा सदस्य अमरसिंह रजपूत, प्रा.सचिन कांबळे प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

तरूण भारत



## क्रांतीसिंह नाना पाटील यांना अभिवादन

क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. प्रकाश राऊत, डॉ. आशिष देशमुख, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. महादेव भिलावे, डॉ. सुनिल गायकवाड, डॉ. ए. डी. गोफणे आदी.

जनसंपर्क कक्ष
0 7 AUG 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शोधनिबंधांचा संग्रह संशोधकांसाठी पथदर्शक

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; शिवाजी विद्यापीठात राज्यस्तरीय परिसंवाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या 'बेटी बचाओ अभियान'अंतर्गत प्रकाशित करण्यात आलेला शोधनिबंधांचा संग्रह देशभरातील संशोधकांसाठी पथदर्शक स्वरूपाचा आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

विद्यापीठाच्या 'बेटी बचाओ अभियाना'तर्फे 'गर्ल चाईल्ड इन महाराष्ट्र : इश्यूज अँड प्रॉस्पेक्टस्' या विषयावरील राज्यस्तरीय परिसंवादामध्ये महाराष्ट्रासह अन्य राज्यांतील संशोधकांनी शोधनिबंध सादर केले होते. या शोधनिबंधांचे विद्यापीठातर्फे ग्रंथरूपात संकलन करण्यात आले. डॉ. प्रतिभा पवार यांनी संपादित केलेल्या या ग्रंथाचे कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत प्रकाशन झाले. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, बेटी बचाओ अभियानाच्या माध्यमातून विद्यापीठासह महाविद्यालयीन स्तरावर होत असलेले जनजागृतीचे कार्य कौतुकास्पद आहे.

शारदाबाई पवार अध्यासनाच्या संचालक डॉ. भारती पाटील, समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रतिमा पवार यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. योजना पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. जगन कराडे, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. मीना पोतदार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 AUG 2023
तरुण भारत

# गुणवंत महाविद्यालय, अधिविभाग प्रमुखांचा सत्कार

■ ९ महाविद्यालय, एका अधिविभागाचा गौरव

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती' प्राप्त गुणवंत महाविद्यालयाच्या प्राचार्यांचा व अधिविभागातील अधिविभागप्रमुखांचा गुणगौरव समारंभ झाला. निलांबरी सभागृहात ९ महाविद्यालय व एका अधिविभागाचा गुणवंत म्हणून गौरव करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते गौरव करण्यात आले.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतून शहरी गटातून विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग, निमशहरी गटातून आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ बी. फार्मसी, आष्टा जि. सांगली, ग्रामीण गटातून संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरीग, महागाव, ता.गडहिंग्लज वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतून शहरी गटातून श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी, निमशहरी गटातून डी. आर. माने महाविद्यालय, कागल, ग्रामीण गटातून श्री. यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर व भोगावती महाविद्यालय, कुरूकली या महाविद्यालयांचे समान विद्यार्थी संख्या असलेने दोन्हीही महाविद्यालयांचा गौरव करण्यात आला. मानवविज्ञान विद्याशाखेतून शहरी गटातून शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर, निमशहरी गटातून डी. आर. माने महाविद्यालय, कागल, ग्रामीण गटातून पद्मभुषण डॉ. क्रांतीवीर नागनाथ अण्णा नाईकवडी कला महाविद्यालय, झरे तसेच आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतून शहरी गटातून यशवंतराव चव्हाण स्कुल ऑफ सोशल वर्क, जकातवाडी, सातारा यांचा गुणगौरव केला.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. उपकुलसचिव बी. एम. नाळे यांनी आभार मानले. अभिजीत लिंग्रस यांनी सुत्रसंचालन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अधिष्ठाता डॉ. एस. एस महाजन, डॉ. एम. एस. देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आदी उपस्थित होते.

तरूण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील एम. ए. मास कम्युनिकेशन विभागातील आयोजित कार्यशाळेचे उद्‌घाटन रोपाला पाणी घालून करताना डॉ. आर. बी. पाटील, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, विराज चव्हाण.

# शिवाजी विद्यापीठात कॅमेरा हँडलिंग वर्कशॉपला उत्स्फूर्त प्रतिसाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागात आयोजित कॅमेरा हँडलिंग कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. डेहरादूनमधील अकॅडमी ऑफ प्रोफेशनल फोटोग्राफी इन्स्टिट्यूटचे विराज चव्हाण यांनी बारकावे समजावून सांगितले. चव्हाण यांनी प्रॉडक्ट फोटोग्राफी, आर्किटेक्चर फोटोग्राफी यासह भारतीय लष्करासाठी केलेली फोटोग्राफी, हेरिटेज इमारतीची फोटोग्राफी आदींचे सादरीकरण त्यांनी विद्यार्थ्यांसमोर केले. सत्रात प्रत्यक्ष कॅमेरा हाताळणी, फोटो अँगल यासह अनेक डेमो करून दाखवले. प्रास्ताविक मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. गौतमी शिकलगार यांनी स्वागत केले. मेघा मोहिते यांनी आभार मानले. यावेळी डॉ. आर. बी. पाटील, चित्रपट अभ्यासक डॉ. अनमोल कोठाडिया, प्रा. आनंदा पांढरबळे, प्रा. जयप्रकाश पाटील, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. प्रसाद ठाकूर, गिरीश फोंडे आदी उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात कॅमेरा हँडलिंग वर्कशॉपला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागात आयोजित कॅमेरा हँडलिंग वर्कशॉपला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या हस्ते वर्कशॉपचे उद्घाटन झाले. देहरादून येथील अॅकॅडमी ऑफ प्रोफेशनल फोटोग्राफी इन्स्टिट्यूटचे विराज चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना फोटोग्राफीचे बारकावे समजावून सांगितले. प्रॉडक्ट फोटोग्राफी, आर्किटेक्चर फोटोग्राफी, यासह भारतीय लष्करासाठी केलेली फोटोग्राफी, हेरिटेज इमारतींच्या फोटोग्राफीचे सादरीकरण केले.

पहिल्या सत्रात कॅमेरा बॉडी, पिक्सल, कॅमेरा वर्क, शटर स्पीड, लाईट इफेक्ट, व्हाईट बॅलन्स, फोटो स्पीड यांच्यासह अनेक तांत्रिक बाबींची विद्यार्थ्यांना माहिती दिली. दुसऱ्या सत्रात प्रत्यक्ष कॅमेरा हाताळणी, फोटो अँगल यासह अनेक डेमो करून दाखवले. प्रा. डॉ. महाजन यांनी नवीन शैक्षणिक धोरणात कौशल्य विकासावर भर दिला आहे. फोटोग्राफी वर्कशॉप हा कौशल्य विकासाचा एक भाग असल्याचे नमूद केले.

गौतमी शिकलगार या विद्यार्थिनीने स्वागत केले. प्रास्ताविक मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. मेघा मोहिते हिने आभार मानले. यावेळी समाजशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. आर. बी. पाटील, डॉ. अनमोल कोठाडिया, आनंदा पांढरबळे, जयप्रकाश पाटील, डॉ. सुमेधा साळुंखे, गिरीश फोंडे आदी उपस्थित होते.

0-7 AUG 2023 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॅमेरा हँडलिंग वर्कशॉपला प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. मास कम्युनिकेशन विभागात आयोजित कॅमेरा हँडलिंग वर्कशॉपला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या हस्ते वर्कशॉपचे उद्घाटन झाले.

यावेळी समाजशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. आर. बी. पाटील, चित्रपट अभ्यासक डॉ. अनमोल कोठाडिया, ऐतवडे खुर्द येथील वारणा महाविद्यालयातील पत्रकारिता विभागातील आनंदा पांढरबळे, घोडावत विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागातील जयप्रकाश पाटील, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. प्रसाद ठाकूर, गिरीश फोंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. देहराडून येथील अॅकॅडमी ऑफ प्रोफेशनल फोटोग्राफी इन्स्टिट्यूटचे विराज चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना फोटोग्राफीचे बारकावे समजावून सांगितले. प्रॉडक्ट फोटोग्राफी, आर्किटेक्चर फोटोग्राफी यासह भारतीय लष्करासाठी केलेली फोटोग्राफी, हेरिटेज इमारतीची फोटोग्राफी आदींचे सादरीकरण त्यांनी विद्यार्थ्यांसमोर केले. पहिल्या सत्रात कॅमेरा बॉडी, पिक्सल, कॅमेरा वर्क, शटर स्पीड, लाईट इफेक्ट, व्हाईट बॅलन्स, फोटो स्पीड, तर दुसऱ्या सत्रामध्ये प्रत्यक्ष कॅमेरा हाताळणी, फोटो अँगल यासह अनेक डेमो करून दाखवले. गौतमी शिकलगार या विद्यार्थिनीने स्वागत केले, तर मेघा मोहिते हिने आभार मानले.

पुण्यनगरी

# शिष्यवृत्तीत डी. आर. माने महाविद्यालय प्रथम

**कागल :** शिवाजी विद्यापीठामार्फत दरवर्षी देण्यात येणाऱ्या विविध गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये निमशहरी विभागात डी. आर. माने महाविद्यालयाने प्रथम क्रमांक प्राप्त केला. सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात शैक्षणिक गुणवत्ता, क्रीडा व निराधार विद्यार्थी या प्रकारामध्ये महाविद्यालयाच्या एकूण ३४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. सलग दुसऱ्या वर्षी डी. आर. माने महाविद्यालयाला हा बहुमान मिळालेला आहे. पुरस्कार वितरण सोहळा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत पार पडला. महाविद्यालयातर्फे संस्थेचे उपाध्यक्ष सुनील माने व प्राचार्य डॉ. प्रवीण चौगले यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी अधिसभा सदस्य अमरसिंह रजपूत, प्रा. सचिन कांबळे व महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.